महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645

मासं/रवका/न.क्र.०५/१३५००
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.
email : cgmhrmsedcl@gmail.com
website : www.mahadiscom.in
दुरध्वनी क्र. ०२२ - ६९४२५१४१
दिनांक: २१.०४.२०२६

# परिपत्रक

**विषय :** सन २०२६ करीता बदली धोरण राबविण्याबाबत.

**संदर्भ :** प्रशासकीय परिपत्रक क्र.६९२ दि.०९.०४.२०२५.

******

कंपनी अंतर्गत अधिकारी व कर्मचारी यांच्या सर्वसाधारण तसेच विनंती बदल्या करण्याकरिता प्रशासकीय परिपत्रक क्र.६९२ दि.०९.०४.२०२५ अन्वये एकत्रित सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

२. या अनुषंगाने सन २०२६ मध्ये बदली धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी खालील मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

क) सन २०२६ मध्ये करण्यात येणाऱ्या एकूण बदल्या प्रत्येक पदावर कार्यरत कर्मचारी संख्येच्या ३०% मर्यादेपर्यंतच राहतील. त्यापैकी सर्वसाधारण बदल्या आणि विनंती बदल्या समप्रमाणात असतील. सर्वसाधारण बदल्या जर कमी झाल्या तर उर्वरीत वाढ विनंती बदल्यांमध्ये करण्यास हरकत नाही.

ख) i) प्रशासकीय परिपत्रक क्र.६९२ दि.०९.०४.२०२५ मधील तरतुदींनुसार राज्यस्तरीय सेवाज्येष्ठतेमधील अधिकारी/कर्मचारी यांची सर्वसाधारण बदली करीत असतांना गाव/शहराच्या हद्दीबाहेर पदस्थापना देण्यात यावी. तथापि, उप विभागीय/विभागीय/मंडल/परिमंडल कार्यालयांचे कार्यक्षेत्र जर एका शहरात/गावात असेल तर अशा प्रकरणी नमूद कालावधीनुसार संबंधित अधिकारी/कर्मचारी यांची सर्वसाधारण बदली कार्यरत असणाऱ्या कार्यालयाच्या आवाराबाहेर करण्याची दक्षता घ्यावी.

ii) प्रशासकीय परिपत्रक क्र.६९२ दि.०९.०४.२०२५ मधील तरतुदींनुसार मंडलस्तरीय व विभागस्तरीय सेवाज्येष्ठतेमधील सर्व कर्मचारी यांची नमूद कालावधीनुसार सर्वसाधारण बदली संबंधित मंडल व विभाग यांच्या कार्यक्षेत्रामध्ये करताना कामाचे ठिकाण/कार्यालय यामध्ये बदल करण्यात यावा. तसेच अशा बदल्या करतांना सदरचे कामाचे ठिकाण/कार्यालय एकाच आवारामध्ये असू नये याची दक्षता घेण्यात यावी.

iii) सबब, सर्वसाधारण बदली धोरण राबविताना नमूद कालावधीनुसार बदली करतेवेळी संबंधित सक्षम अधिकाऱ्यांनी परिमंडलातील/मंडलातील भौगोलिक परिस्थितीचा सारासार विचार करून निर्णय घ्यावा.

ग) कंपनीतील ज्या कर्मचाऱ्यांच्या पती/पत्नी सद्यस्थितीत सैनिक सेवेत असून सीमेवरती कार्यरत आहेत, अशा कर्मचाऱ्यांच्या विनंती बदली/बदलीपासून सूट मिळण्याबाबतच्या अर्जाचा सहानुभूतीपूर्वक विचार करण्यात यावा.

घ) अनिवार्य रिक्त पदांची (Compulsory Vacancy-CV) संकल्पना सन २०२६ करीता तात्पुरती स्थगित करण्यात येत आहे. तथापि, संबंधित सक्षम अधिकाऱ्यांनी SCADA सारख्या कार्यालयांमध्ये सविस्तर पदस्थापना/सर्वसाधारण बदली न देता महत्वाच्या जागा प्राधान्याने भरण्याबाबतची दक्षता घ्यावी.

च) प्रादेशिक कार्यालयांमधील तांत्रिक संवर्गाचे राज्यस्तरीय सेवाज्येष्ठतेमधील अतिरिक्त कार्यकारी अभियंता व त्या खालील स्तरावरील कर्मचाऱ्यांची परिमंडळांतर्गत बदली/सविस्तर पदस्थापना करण्याचे अधिकार संबंधित मुख्य अभियंता यांना असतील.

छ) क्षेत्रिय स्तरावरील सर्व स्थापत्य आणि प्रादेशिक कार्यालयांमधील अतांत्रिक संवर्गाचे राज्यस्तरीय सेवाज्येष्ठता यादीतील व्यवस्थापक (विवले) वगळून त्या खालील स्तरावरील कर्मचाऱ्यांची तसेच व्यवस्थापक (मासं) व त्या खालील स्तरावरील कर्मचाऱ्यांची परिमंडळांतर्गत बदली/सविस्तर पदस्थापना देण्याचे अधिकार संबंधित मुख्य अभियंता यांना असतील.

ज) कामावर कार्यरत असतांना अपघात झाल्यास व अपघातानंतर संबंधित कर्मचाऱ्यास शारिरिक हालचालीवर बंधन आल्यास अशा कर्मचाऱ्यांच्या सर्वसाधारण बदल्या करतांना सहानुभूतीपूर्वक विचार करण्यात यावा.

३. प्रशासकीय परिपत्रक क्र.६९२ दि.०९.०४.२०२५ मधील अन्य तरतुदी अबाधीत राहतील. सबब, सर्व सक्षम अधिकारी यांना विनंती करण्यात येते की, सन २०२६ मध्ये अधिकारी व कर्मचारी यांच्या बदल्या करीत असतांना बदली विषयक लागू करण्यात आलेल्या एकत्रित सूचना व उपरोक्त मार्गदर्शक सूचनांचे तसेच बदली आदेश व कार्यमुक्तीबाबत विहित करण्यात आलेल्या वेळापत्रकाचे काटेकोरपणे पालन होईल याची दक्षता घ्यावी.

४. सदर परिपत्रक कंपनीच्या e-Library वर उपलब्ध करण्यात आले आहे.

**( भूषण कुलकर्णी )**
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**

**प्रत सविनय सादर:**

१) संचालक (वित्त)/(संचलन)/(प्रकल्प)/(वाणिज्य)/(मासं) म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय,मुंबई.
२) सह व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय छत्रपती संभाजीनगर/कल्याण.
३) कार्यकारी संचालक (सुवअं)/(मासं)/(पायाभूत आराखडा/विशेष प्रकल्प)/(देयके व वसूली)/(वितरण)/(माहिती तंत्रज्ञान)/ (वित्त व लेखा) म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय,मुंबई.
४) प्रादेशिक संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय पुणे/नागपूर.

**प्रत सस्नेह रवाना:**

१) मुख्य महाव्यवस्थापक (तां/आ)/(सांघिक वित्त)/(अंतर्गत लेखा परिक्षण/(सांघिक लेखा)/(माहिती तंत्रज्ञान)/ मुख्य विधी सल्लागार/मुख्य तपास अधिकारी/ कंपनी सचिव म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय,मुंबई.
२) मुख्य महाव्यवस्थापक (प्रवसु) म.रा.वि.वि.कं.मर्या,नाशिक.
३) मुख्य अभियंता (स्थापत्य), स्थापत्य परिमंडल, म.रा.वि.वि.कं.मर्या.,मुंबई.
४) सर्व मुख्य अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्या., मुंबई. (सांघिक कार्यालय/क्षेत्रीय कार्यालय)

**प्रत रवाना:**

१) महाव्यवस्थापक (मासं)/(मासं-मासंव्यप्र)/(नियोजन), म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय,मुंबई.
२) मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी/मुख्य जनसंपर्क अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय,मुंबई.
३) मा.अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांचे विशेष कार्य अधिकारी,म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय,मुंबई.